# श्री. शिवकिसन नारायण ठवकर

सेवक क्र. ८८५ मु. खापा, त. तुमसर, जि. भंडारा

बुधवार दि. ९-८-७८ नागपंचमीच्या दिवशी मला खोकल्याची उमळ आली. माझ्या तोंडातून रक्ताचे ठसे पडू लागले. प्रथम गावठी उपचार केले. त्यांनी आराम पडला नाही. नंतर दवाखान्यात जाऊन तपासणी केली तर डॉक्टरांनी सांगितले की भंडाऱ्याला लवकरात लवकर जा व तपासणी करुन एक्सरे काढून द्या. मग आम्ही उपचार करु. एक्सरेशिवाय उपचार करता येणार नाही. मी घरी परत आलो. आल्यानंतर दोन वाजण्याच्या सुमारास माझी वाचा बंद झाली. माझा गळा धरुन सगळे रडायला लागले. काही वेळाने मला थोडी चेतना आली. चेतना आल्यावर मला पुनः खाटेवर झोपवले. गावातले सर्व लोक जमा झाले व टीकाटिपणी करु लागले. वैद्य-वाणी उपचार करु लागले. पण फायदा झाला नाही. मग ढोरवाड्यावरुन दुसऱ्या वैद्यांना बोलविले. त्यांनी सांगितले, ''तुम्ही कालघडीच्या सपाट्यात सापडले आहात. तुमचे वाचणे कठीण आहे.'' आता आपण काय करावे असा प्रश्न पडला. यावेळी आमच्या गावाला तेरवीचा कार्यक्रम होता. म्हणून खिडकीचे दोन चार लोक आले होते. ते माझ्या भेटीला आले. त्यांना मी विचारले की मला एखादा वैद्य सांगा. कितीही खर्च आला तरी काही हरकत नाही. पण मला काटा गडला नाही पाहिजे. त्सांनी मला सांगितले की, तुम्ही नागपूरच्या बाबांचा धर्म घ्या. पण त्यासाठी देवधर्म सोडावा लागतो. मी सांगितले की, पन्नास रुपये लागले तरी हरकत नाही. बाबांना बोलावून आणा. ते म्हणाले की, बाबा काही येऊ शकत नाही. तुम्ही खिडकीला सावकारजीकडे चला. ते तुम्हाला सल्ला देतील. मी सांगितले की, माझ्यात चालण्याची देखील शक्ती नाही. मी कसा येऊ? ते म्हणाले की, आंधळगावपर्यंत कसे तरी चला. नंतर आम्ही खाचर आणू. मला रात्रभर झोप लागली नाही. सकाळ झाली. मी कुटुंबातील लोकांना विचारले. ते मला म्हणाले, देवधर्म सोडू नका. जे कोणी सांगतो ते करावे आणि देवधर्माचेही करावे. मी विचार केला. घरी मरण्यापेक्षा बाहेर मेलो तरी काही हरकत नाही आणि रडत रडत कसातरी त्याच्यामागे निघालो. बाबुरावजी शिंगनजुळैला वैद्यांच्याबाबतीत विचारले. त्यांनी मला सल्ला दिला की सावकारजींनी घेतला हा मार्ग धरा. मग तुम्हाला वैद्याची आवश्यकताच पडणार नाही. तुम्ही स्वतःच वैद्य बनाल. मग आम्ही सावकारजींकडे गेला. सावकारजींनी विचारपूस

केली. सावकारजींनी सांगितल्याप्रमाणे भगवंताला अगरबत्ती लावून वचन दिले आणि विनंती केली. रात्रभरात माझी प्रकृती ठीक झाली. दिवसभर विचार करु लागलो. मी रोज कसा होतो आणि आज कसा आहे. सायंकाळी सावकारजींनी सांगितले. नागपूरला चलता का म्हणून सावकारजींनी विचारले. मी म्हटले, 'नागपूरलाच काय चलता मुंबईला न्याल तरी माझी येण्याची तयारी आहे.' आम्ही नागपूरला बाबांकडे आलो. कुटुंबातील लोकांचा सल्ला घेण्याबद्दल बाबांनी सांगितले. त्यावर मी म्हणालो, मी मरत होतो तेव्हा कोणी धावले नाही व कोणी सल्ला दिला नाही. तेव्हा आताच कशाला विचारायचे? नंतर बाबांनी अकरा दिवस दिलेत. त्यानंतर बेचाळीस दिवस सावकारांकडून घेण्यास सांगितले. बेचाळीस दिवस आनंदाने पार पडले. त्यानंतर हवन कार्य आनंदाने झाले. तेव्हापासून मी पूर्ण सुखी व समाधानी आहे.

* * * * *